MHWS110000512026

दि.कि.अर्ज क्र.२८/२०२६
वंदना सुरसे+२ वि. निरंक

**निशाणी क्र.१ खाली आदेश**

(दिनांक **१ एप्रिल, २०२६** रोजी पारित)

१. प्रस्तुत अर्ज मय्यत **अनंत माणिकराव सुरसे** यांचा वारस दाखला मिळण्याकरीता दाखल केलेला आहे.

२. **अर्जदार यांचे कथन खालीलप्रमाणे –**

अर्जदार क्र.१ ही मय्यत अनंत माणिकराव सुरसे यांची पत्नी असून अर्जदार क्र.२ व ३ ही मुले आहेत. मय्यत अनंत माणिकराव सुरसे यांचा मृत्यू दिनांक १७/०८/२०२५ रोजी रेस्ट हाऊसजवळ, तुषार कॉलनी, कारंजा लाड, ता.कारंजा, जि.वाशिम येथे त्यांच्या राहत्या घरी झाला. मय्यत अनंत माणिकराव सुरसे हे तुषार कॉलनी, कारंजा लाड, ता.कारंजा, जि.वाशिम येथील कायमचे रहिवाशी होते. करिता अर्जदारांव्यतिरिक्त मय्यत अनंत माणिकराव सुरसे यांना अन्य कोणीही कायदेशीर वारस नाहीत.

३. अर्जदारांचे पुढे कथन आहे की, मय्यत अनंत माणिकराव सुरसे यांच्या मृत्यु नंतर अर्जदारांना शासकिय व निम–शासकिय कामासाठी मय्यत अनंत माणिकराव सुरसे यांचे वारस असल्याबाबतचा वारस दाखला हवा आहे. सबब, अर्जदारांनी मय्यत अनंत माणिकराव सुरसे यांचे वारस असल्याबाबत वारस प्रमाणपत्र मिळणेसाठी विनंती केलेली आहे.

४. निशाणी क्रमांक ०१ वर आदेश पारीत करुन दिनांक २५/०१/२०२६ रोजीच्या 'पुण्यनगरी' निशाणी क्र.१४ या वर्तमान पत्रातुन जाहीर प्रगटन देवून तसेच जाहीरनाम्याद्वारे हरकती मागविण्यात आल्या होत्या. परंतु अद्यापपावेतो कोणीही हरकत नोंदविलेली नाही.

५. अर्जदारांच्या कथनांवरून माझे समोर खालील मुद्दे उपस्थित झालेले आहेत. त्यावरील निष्कर्ष मी कारणमिमांसे सह पुढील प्रमाणे देत आहे.

| अ.क्र | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | अर्जदार हे मागणी केल्याप्रमाणे वारस दाखला मिळण्यास पात्र आहेत काय? | **होय.** |
| २. | काय आदेश? | **अर्ज मंजूर** |

**<u>का र ण मि मां सा</u>**

**<u>मुद्दा क्र.१ बाबत –</u>**

६. सदर अर्जाचे पृष्ट्यर्थ अर्जदार कार्तिक अनंत सुरसे याने स्वतःचे पुराव्याचे शपथपत्र निशाणी क्र.८ वर दाखल केले आहे. अनंत माणिकराव सुरसे यांच्या मृत्यू प्रमाणपत्राची मुळ प्रत निशाणी क्रमांक १०, अर्जदारांच्या आधारकार्डच्या प्रमाणित प्रती निशाणी क्र.११ ते १३, तसेच २५/०१/२०२६ रोजीच्या 'पुण्यनगरी' या वर्तमानपत्राची प्रत निशाणी क्र.१४ असे दस्तऐवज दाखल केलेले आहेत. अर्जदारांनी निशाणी क्र.१५ अन्वये पुरसिस दाखल करून त्यांना प्रकरणात आणखी कोणाचाही पुरावा नोंदवायचा नसल्याबाबत सूचविले.

७. जाहीर नोटीस दिल्यानंतरही प्रस्तुत अर्जामध्ये कोणीही हजर झाले नाही, अगर आपली हरकत नोंदविलेली नाही. अर्जदारांच्या वतीने त्यांच्या वकीलांनी असा युक्तीवाद केला की, मय्यत अनंत माणिकराव सुरसे यांचा मृत्यु झालेला आहे. त्यामुळे अर्जदारांव्यतिरीक्त मय्यत अनंत माणिकराव सुरसे यांना इतर कोणीही कायदेशीर वारस नाहीत.

८. येथे हे नमूद करणे गरजेचे आहे की, १८२७ चे मुंबई नियमन या अधिनियमाचा हेतू हा कायदेशीर वारसांची औपचारिक मान्यता देण्यापुरता मर्यादीत आहे. त्यामुळे सदर अर्जासंदर्भात न्यायालयीन चौकशीची व्याप्ती केवळ अर्जदाराच्या वारस असल्याच्या दाव्याची खात्री करण्यापर्यंतच मर्यादीत असते. वारस दाखल्यामुळे अर्जदार वारसास मालमत्ते संदर्भात

कोणतेही मालकी हक्क प्राप्त होत नाहीत किंवा इतर वारसांच्या तत्संबंधी अधिकारास बाधा पोहोचत नाही. सदर दाखला प्राप्त वारस व्यक्तीला त्या वेळेपुरती त्याच्या सदर मालमत्ता व्यवस्थापनाच्या अधिकारास मान्यता दिली जाते.

९. अभिलेखावर दाखल कागदपत्रे व पुराव्यावरुन असे निदर्शनास येते की, अर्जदार हेच मय्यत अनंत माणिकराव सुरसे यांचे कायदेशीर वारस आहेत व अर्जदारांव्यतिरीक्त त्यांना इतर कोणीही कायदेशीर वारस आहेत असे दर्शविणारा कोणताही कागदोपत्री पुरावा अभिलेखावर नाही. अर्जदारांनी दिलेला पुरावा हा अटळ व अबाधित राहीला व सदर पुराव्यावर अविश्वास दर्शवावा असे कोणतेही कारण दिसून येत नाही. म्हणुन मी मुद्दा क्र.१ चा निष्कर्ष होकारार्थी नोंदवित आहे व मुद्दा क्र.२ बाबत मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

१. अर्ज मंजुर करण्यात येत आहे.

२. नियमानुसार न्यायालयीन शुल्क भरल्यानंतर बॉम्बे रेग्युलेशन, १८२७ मधील परिशिष्ट (अपेन्डीक्स)–ब प्रमाणे वारस अर्जदार क्र.१ वंदना अनंत सुरसे, अर्जदार क्र.२ अश्वीन अनंत सुरसे आणि अर्जदार क्र.३ कार्तिक अनंत सुरसे यांना मय्यत अनंत माणिकराव सुरसे यांचे औपचारिक कायदेशीर वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र देण्यात यावे.

DISTRICT COURTS MAHARASHTRA
Digitally signed by NERLIKAR BHUSHAN ANANDRAO
Date: 2026.04.01 16:22:55 +0530

| | | |
|---|---|---|
| दिनांकः ०१/०४/२०२६. | | **(बी. ए. नेरलीकर)**<br>२ रे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर),<br>कारंजा (लाड). |

## CERTIFICATE

I affirm that the contents of this P.D.F. file Judgment/ Order are same word to word as per the original order.

| | | |
|---|---|---|
| Name of Steno | :- | Devendra V. Daware (Stenographer Grade-III) |
| Court Name | :- | 2nd Jt. Civil Judge (Jr.Dn.) and J.M.F.C., Karanja, Dist. Washim. |
| Date | :- | 01/04/2026 |
| Order signed by the presiding officer on | :- | 01/04/2026 |
| Order uploaded on | :- | 01/04/2026 |